F.Y.B.A. (Sem-II) April-2023

Marathi Literature - I **Q.P. Code:00000028**

[**वेळ: ३ तास**] [ **गुण:१००**]

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.**

**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.**

**३. प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १** अ. ‘कविता' या साहित्यप्रकाराची संकल्पना स्पष्ट करुन कवितेचे विशेष सोदाहरण स्पष्ट करा. **20**

**किंवा**

ब. आधुनिक मराठी कवितेच्या विकासाचे ठळक टप्पे थोडक्यात स्पष्ट करा.

**प्र. २** अ. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांमधील आशयसूत्रे तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा. **20**

**किंवा**

ब. मंगेश पाडगावकर यांच्या तुम्ही अभ्यासलेल्या कवितांचे स्वरूपविशेष सोदाहरण स्पष्ट करा.

**प्र. ३** अ. इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतून ग्रामीण कृषीजीवनाचे दर्शन कसे घडते. साधार स्पष्ट करा. **20**

**किंवा**

ब. अरुण काळे यांच्या कवितेतील आशयसूत्रे सविस्तर विशद करा.

**प्र. ४** प्रत्येक गटातील **एक टीप लिहा.** **30**

अ. १. भावगीत व भावकविता-यातील साम्यभेद

**किंवा**

२. कवितेतील लय

ब. १. मर्ढेकरांच्या कवितेतील आधुनिक जाणीव

**किंवा**

२. 'मी इथली' या कवितेचे रसग्रहण करा

क. १. अनुराधा पाटील यांच्या कवितेतील 'स्त्री' चे भावविश्व

**किंवा**

२. वीरधवल परब यांच्या कवितेतील सामाजिक वास्तव

**प्र. ५ एका वाक्यात उत्तरे लिहा.** **10**

१) बहिणाबाई चौधरी यांनी कोणत्या बोलीभाषेत कविता लिहिल्या आहेत?

२) 'मी फूल तृणातिल इवले' या कवितेचे कवी कोण आहेत?

३) 'कितीतरी दिवसात' कवीने काय काय अनुभवले नाही ?

४) सामाजिक वस्तवाशी संघर्ष करणाऱ्या आईच्या मनःस्थितीचे चित्र पद्मा गोळे यांनी कोणत्या कवितेतून मांडले

५) 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ' हा काव्यसंग्रह कोणाचा आहे?

६) नंतर आलेल्या लोकांनी कोणाचा शोध घेतला नाही, असे कवी म्हणतात?

७) आपल्या कवितेला कशाचा सुगंध यावा, असे इंद्रजित भालेराव म्हणतात?

८) वीरधवल परब यांच्या दोन कवितांची नावे लिहा.

९) कवितेची कोणतीही एक व्याख्या लिहा.

१०) कवितेचा कोणताही एक प्रकार लिहा.